# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# "ड-१०" कक्ष
# विधानपरिषद विशेषाधिकार समिती कक्ष
# विधानसभा विशेषाधिकार समिती कक्ष

**सहायक कक्ष अधिकारी (श्री. संतोष गायकवाड)**

**सहायक कक्ष अधिकारी (रिक्त)**

**कक्ष अधिकारी (श्रीमती जयश्री म्हात्रे)**

**उप सचिव (श्री. उमेश शिंदे)**

**सह सचिव (श्रीमती मेघना तळेकर)**

**सचिव-१ (कार्यभार) (श्री. जितेंद्र भोळे)**

## विशेषाधिकारांबाबत राज्यघटनेतील तरतुदी :-

**संसद व तिचे सदस्य यांच्या शक्ती, विशेषाधिकार व उन्मुक्ती**

१०५. (१) या संविधानाचे उपबंध आणि संसदेच्या कार्यपध्दतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांच्या अधीनतेने, संसदेत भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) संसदेचा कोणताही सदस्य, संसदेत किंवा तिच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही आणि कोणतीही व्यक्ती संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकारा अन्वये किंवा त्याखाली प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतीत, संसदेचे प्रत्येक सभागृह आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य व समित्या यांच्या शक्ती, विशेषाधिकार व उन्मुक्ती या संसद कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि, याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, त्या, सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावे विशोधन) अधिनियम, १९७८" याचे कलम १५ अंमलात येण्याच्या निकटपूर्वी जशा होत्या तशा असतील.

(४) खंड (१), (२) व (३) यांचे उपबंध जसे संसदेच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तसे ते या संविधानाच्या आधारे संसदेच्या कोणत्याही सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण

करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

१२१. सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्य पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत, यात यापुढे उपबंधित केल्यानुसार त्या न्यायाधीशास पदावरुन दूर करण्याची विनंती करणारे समावेदन राष्ट्रपतीस सादर करण्याचा प्रस्ताव आल्याशिवाय संसदेत कोणतीही चर्चा करता येणार नाही.

१२२. (१) कार्यपध्दतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरुन संसदेतील कोणत्याही कामकाजाची विधीग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

(२) संसदेमधील कार्यपध्दतीचे किंवा कामकाज-चालनाचे विनियमन करण्याच्या अथवा संसदेत सुव्यवस्था राखण्याच्या शक्ती या संविधानाद्वारे किंवा त्याखाली ज्याच्या ठायी निहित करण्यात आल्या आहेत अशा, संसदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या शक्तींच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

**राज्य विधानमंडळे व त्यांचे सदस्य यांच्या शक्ती, विशेषाधिकार व उन्मुक्ती**

१९४. (१) या संविधानाचे उपबंध व विधानमंडळाच्या कार्यपध्दतीचे विनियम करणारे नियम व स्थायी आदेश यांच्या अधीनतेने, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळात भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) राज्य विधानमंडळाचा कोणताही सदस्य, विधानमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती अशा विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकारा अन्वये किंवा त्याखाली प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान व कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतीत, राज्य विधानमंडळाचे सभागृह आणि अशा विधानमंडळाच्या सभागृहाचे सदस्य व समित्या यांच्या शक्ती, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, ते विधानमंडळ कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि याप्रमाणे निश्चित होईपर्यंत त्या सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना व समित्यांना "संविधान (चव्वेचाळिसावे विशोधन) अधिनियम, १९७८" याचे कलम २६ अंमलात येण्याच्या निकटपूर्वी जशा होत्या तशा असतील.

(४) खंड (१), (२) व (३) यांचे उपबंध जसे राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तसे ते, या संविधानाच्या आधारे त्या विधानमंडळाच्या सभागृहात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीच्या संबंधात लागू असतील.

२११. सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत राज्य विधानमंडळात कोणतीही चर्चा करता येणार नाही.

२१२. (१) कार्यपध्दतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरुन राज्य विधानमंडळातील कोणत्याही कामकाजाशी विधिग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

(२) राज्य विधानमंडळातील कार्यपध्दतीचे किंवा कामकाज-चालनाचे विनियमन करण्याच्या अथवा विधानमंडळात सुव्यवस्था राखण्याच्या शक्ती या संविधानाद्वारे किंवा त्याखाली ज्याच्या ठायी निहित करण्यात आल्या आहेत अशा, विधानमंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्यानं किंवा सदस्याने त्या शक्तींच्या केलेल्या वापराबाबत तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

# विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद

# नियमातील तरतूदी

## (अ) विशेषाधिकारासंबंधीचे प्रश्न

**२४०.** ह्या नियमांच्या तरतुदीस अधीन राहून, सदस्यास, ज्यात सदस्यांच्या किंवा विधानपरिषदेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न सभापतींच्या संमतीने उपस्थित करता येईल.

**२४१.** विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करू इच्छिणारा सदस्य, ज्या दिवशी त्याने प्रश्न उपस्थित करण्याचे योजिले असेल त्या दिवशी बैठक सुरू होण्यापूर्वी निदान एक तास अगोदर सचिवास लेखी सूचना देईल. उपस्थित केलेला प्रश्न जर एखाद्या कागदपत्रावर आधारित असेल, आणि जर ते कागदपत्र सदस्यांच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असेल तर, नोटिशीबरोबर जोडण्यात येतील.

**२४२.** विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पुढील निर्बंधांस अधीन असेल :- (एक) एका बैठकीत एकापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करण्यात येणार नाहीत, (दोन) प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असेल.

**२४३.** (१) सभापतींनी जर नियम २४० अन्वये संमती दिली असेल तर आणि चर्चा करावयाची बाब नियमानुसार आहे असे त्यांचे मत असेल तर ते प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर आणि यादीतील कामकाज सुरू

करण्यापूर्वी संबंधित सदस्यास पुकारतील, आणि तो सदस्य आपल्या जागेवर उठून उभा राहील व विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी अनुमती मागताना तत्संबंधी थोडक्यात निवेदन करील.

परंतु, जर सभापतींनी नियम २४० अन्वये आपली संमती देण्याचे नाकारले असेल किंवा  जर चर्चा करण्याचे योजिलेली बाब नियमांनुसार काही असे त्यांचे मत असेल तर, त्यांना आवश्यक वाटल्यास, विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना वाचता येईल आणि आपण संमती नाकारली आहे किंवा विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना नियमानुसार नाही असे आपले मत आहे असे निवेदन करता येईल:

आणखी असे की, सभापतींची जर बाबीच्या निकडीबद्दल खात्री झाली असेल तर, प्रश्न निकालात काढल्यानंतर बैठकीच्या मुदतीत कोणत्याही वेळी विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यात संमती देता येईल.

(२) सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी विधानपरिषदेची परवानगी मागितल्यावर, विधानपरिषदेची सदस्यास अनुमती आहे किंवा कसे असे विचारतील. जर हरकत घेण्यात आली तर, जे सदस्य परवानगी देण्यात अनुकूल असतील त्या सदस्यांस आपापल्या जागी उभे राहण्याची सभापती विनंती करतील आणि जर त्याप्रमाणे साताहून कमी नाहीत इतके सदस्य उभे राहिले तर परवानगी देण्यात आली असे सभापती कळवतील.

जर साताहून कमी सदस्य उभे राहिले तर सभापती, विधानपरिषदेची परवानगी नाही असे त्या सदस्यास कळवतील.

**२४४.** नियम २४३ अन्वये परवानगी देण्यात आली असेल तर, सभापतींना आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, उक्त प्रश्न तपासणीसाठी व प्रतिवदेनासाठी म्हणून, विशेषाधिकार समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपविता येईल. सभापती, अशा रीतीने प्रश्न सभागृहाकडे विचारार्थ सोपवतील तेव्हा, सभागृहास उक्त प्रश्नावर विचारविनिमय करण्यास प्रारंभ करता येईल आणि ज्या सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित केला असेल त्या सदस्याच्या किंवा कोणत्याही सदस्यांच्या प्रस्तावावर निर्णय घेता येईल.

**विशेषाधिकार समिती**

**२४५.** यथास्थिती विधानपरिषदेच्या अधिवेशनाच्या सुरूवातीस किंवा वेळोवेळी सभापती, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त *अकरा सदस्यांची एक विशेषाधिकार समिती नामनिर्देशित करतील. समितीचे सदस्य, नवीन समिती नामनिर्देशित करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

**२४६.** (१) समिती तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी करील आणि संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर, प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास भंगाचे स्वरूप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थितीदेखील ठरवील आणि विधानपरिषदेकडे त्याविषयी अहवाल सादर करील.

(२) ह्या नियमाच्या पोट-नियम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, उक्त अहवालात समितीनी केलेल्या शिफारशी अंमलता आणताना विधानपरिषदेने अनुसरावयाची कार्यपद्धतीही नमूद करता येईल.

**२४७.** (१) नियम १७३ मधील तरतुदींस अधीन राहून, विशेषाधिकार समितीप्रमुखांनी किंवा सचिवांनी सही केलेल्या आदेशाद्वारे साक्षीदारास बोलावता येईल आणि तो, समितीच्या उपयोगासाठी आवश्यक असतील असे कागदपत्र सादर करील.

(२) समितीपुढे सादर केलेला कोणताही पुरावा गुप्त किंवा गोपनीय समजणे हे समितीच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

**२४८.** अहवाल सादर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर, विशेषाधिकार समितीप्रमुख किंवा समितीचा कोणताही सदस्य त्या अहवालावर विचार करण्यात यावा असा प्रस्ताव मांडतील.

**२४९.** कोणत्याही सदस्यास, नियम २४८ मध्ये उल्लेख केलेल्या अहवालावर विचार करण्यासाठी मांडलेल्या प्रस्तावाच्या सुधारणेची सूचना, सभापतींना योग्य वाटेल अशा नमुन्यात देता येईल:

परंतु, उक्त प्रश्न एक तर मर्यादा न घालता किंवा कोणत्याही विवक्षित बाबीस अनुलक्षून समितीकडे पुन्हा सुपुर्द करण्यात यावा असा सुधारणेचा प्रस्ताव मांडता येईल.

**२५०.** सभापतींना, समितीतील किंवा विधानपरिषदेतील विशेषाधिकाराचा प्रश्न विचारात घेण्याशी संबंध असलेल्या सर्व बाबीसंबंधीच्या

कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी त्यांना आवश्यक वाटतील असे निदेश देता येईल.

२५१. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी सभापतींना विशेषाधिकाराचा कोणताही प्रश्न विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी, चौकशीसाठी किंवा अहवाल सादर करण्यासाठी सोपविता येईल.

**(ब) सदस्यास अटक, स्थानबद्ध वगैरे केल्याबद्दल आणि सुटका केल्याबद्दल सभापतींना कळविणे**

२५२. जेव्हा विधानपरिषदेच्या एखाद्या सदस्यास फौजदारी गुन्हा केल्या आरोपावरून किंवा एखाद्या फौजदारी गुन्ह्यासाठी अटक करण्यात आली असेल किंवा त्यास न्यायालयाने कैदेची शिक्षा दिली असेल किंवा एखाद्या कार्यकारी आदेशान्वये त्यास स्थानबद्ध केले असेल तेव्हा ती कार्यवाही करणारा यथास्थिती, न्यायाधीश, दंडाधिकारी किंवा कार्यकारी प्राधिकारी ताबडतोब अशा गोष्टींची सूचना सभापतींना देईल आणि तीत यथास्थिती अशा अटक, स्थानबद्धता किंवा दोषसिध्दी यांबदल्लची कारणे तसेच सदस्यांच्या स्थानबध्दतेचे किंवा दोषसिध्दी यांबद्दलची कारणे तसेच सदस्यांच्या स्थानबध्दतेचे किंवा कैदेचे ठिकाण दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात दर्शविण्यात येईल.

२५३. जेव्हा विधानपरिषदेच्या सदस्यावर करण्यात आलेला खटला अनिर्णीत असताना किंवा त्याच्या दोषसिद्धीविरूद्ध त्याने केलेले अपील अनिर्णीत असताना किंवा अन्यप्रकारे त्याची जामीनावर

सुटका करण्यात आली असेल तेव्हा संबंधित प्राधिकारी अशी गोष्ट सुद्धा दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात सभापतींना कळवील.

**२५४.** नियम २५२ किंवा नियम २५३ मध्ये उल्लेखिलेला पत्रव्यवहार सभापतींना मिळाल्यावर सभापती शक्य तितक्या लवकर पुढीलप्रमाणे त्या बाबतीत कार्यवाही करतील:-

(एक) अधिवेशन चालू असताना अशी अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबद्ध किंवा कैद करण्यात आले असेल तर सभापती ही गोष्ट सभागृहास कळवतील. त्यानंतर अधिवेशन चालू असतानाच, सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर अशी गोष्ट सुद्धा सभागृहास कळविण्यात येईल;

(दोन) ज्या कोणत्याही सदस्यास सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबद्ध किंवा कैद करण्यात आले असेल त्या सदस्याचे अशा रीतीने

अटकेत किंवा स्थानबद्धतेत किंवा कैदेत असणे सभागृहाचे अधिवेशन सुरू झाल्यावरही चालू असेल तर, सभापती, अशी गोष्ट सभागृहास कळवतील. त्यानंतर अधिवेशन चालू असतानाच सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर उक्त गोष्टसुद्धा सभागृहास कळविण्यात येईल.

(तीन) इतर सर्व बाबतीत अशाप्रकारचा पत्रव्यवहार विधानपरिषदेच्या सदस्यांच्या माहितीसाठी पत्रकामध्ये प्रसिद्ध करण्यात यावा असा सभापती निदेश देतील.

**(क) सभागृहाच्या आवारात वैध आदेशिका बजावण्याची आणि अटक करण्याची कार्यपद्धती**

**२५५.** सभापतींची परवानगी मिळविल्याशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही प्रकारे अटक करता येणार नाही.

**२५६.** सभापतींची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात दिवाणी स्वरूपाची किंवा फौजदारी स्वरूपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजाविण्यात येणार नाही.

**(महाराष्ट्र विधानपरिषद नियम पुस्तिका, पृष्ठ क्र. ९०-९३)**

## विशेषाधिकार संदर्भात महाराष्ट्र विधानसभा

## नियमातील तरतूदी (अ) विशेषाधिकारासंबंधीचे प्रश्न

**२७३.** ह्या नियमांच्या तरतुदीस अधीन राहून सदस्यांस, ज्यात सदस्यांच्या किंवा विधानसभेच्या किंवा तिच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न अध्यक्षांच्या संमतीने उपस्थित करता येईल.

**२७४.** विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करू इच्छिणारा सदस्य, ज्या दिवशी ज्याने प्रश्न उपस्थित करण्याचे योजिले असेल त्या दिवशी बैठक सुरू होण्यापूर्वी निदान एक तास अगोदर सचिवास लेखी नोटीस देईल. उपस्थित केलेला प्रश्न जर एखाद्य कागदपत्रावर आधारित असेल आणि जर सदरहू कागदपत्र सदस्यांच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असेल तर नोटीशीबरोबर ते कागदपत्र जोडण्यात येतील.

**२७५.** विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पुढील निर्बंधांस अधीन असेल :- (एक) एका बैठकीत एकापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करण्यात येणार नाहीत.

(दोन) असा प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असेल.

**२७६.** (१) अध्यक्षांनी, जर नियम २७३ अन्वये संमती दिली असेल तर आणि

चर्चा करावयाची बाब नियमानुसार आहे असे त्यांचे मत असेल तर, ते प्रश्न उपस्थित करण्यात आल्यानंतर आणि यादीतील कामकाज सुरू करण्यापूर्वी संबंधित सदस्यात पुकारतील आणि सदरहू सदस्य आपल्या जागेवर उठून उभा राहील व विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी अनुमती मागताना तत्संबंधी थोडक्यात निवेदन करील:

परंतु जर अध्यक्षांनी नियम २७३ अन्वये आपली संमती देण्याचे नाकारले असेल किंवा जर चर्चा करण्याचे योजिलेली बाब नियमानुसार नाही असे त्यांचे मत असेल तर, त्यांना आवश्यक वाटल्यास, विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना वाचता येईल आणि आपण संमती नाकारली आहे किंवा विशेषाधिकाराच्या प्रश्नांची सूचना नियमानुसार नाही असे आपले मत आहे, असे निवेदन करता येईल. आणखी असे की, अध्यक्षांची जर बाबींच्या निकडीबद्दल खात्री झाली असेल तर, त्यांना प्रश्नांची विल्हेवाट लागल्यानंतर बैठकीच्या मुदतीत कोणत्याही वेळी विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यात संमती देता येईल.

(२) सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न् उपस्थित करण्यासाठी विधानसभेची अनुमती मागितल्यावर, विधानसभेची सदस्यांस अनुमती आहे किंवा कसे असे अध्यक्ष त्यास विचारतील. जर हरकत घेण्यात आली असेल तर, जे सदस्य अनुमती देण्यास अनुकुल असतील त्या सदस्यांस आपल्या जागी उभे राहण्याची अध्यक्ष विनंती करतील आणि जर त्याप्रमाणे २० सदस्य उभे राहिले तर अनुमती देण्यात आली आहे असे अध्यक्ष कळवतील. जर २० पेक्षा कमी सदस्य उभे

राहिले तर अध्यक्ष, विधानसभेची अनुमती नाही असे त्या सदस्यांस कळवतील.

२७७. नियम २७६ अन्वये अनुमती देण्यात आली असेल तर, अध्यक्षांना, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार उक्त प्रश्न तपासणीसाठी व प्रतिवेदनासाठी म्हणून, विशेषाधिकार समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपाविता येईल, अध्यक्ष अशा रीतीने प्रश्न सभागृहाकडे विचारार्थ सोपवतील तेव्हा, सभागृहास उक्त प्रश्नांवर विचारविनिमय करण्यास प्रारंभ करता येईल आणि ज्या सदस्याने विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित केला असेल त्या सदस्यांच्या किंवा इतर कोणत्याही सदस्यांच्या प्रस्तावावर निर्णय घेता येईल.

**विशेषाधिकार समिती**

२७८. यथास्थिती, विधानसभेच्या अधिवेशनाच्या सुरूवातीस, किंवा वेळोवेळी, अध्यक्ष विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त *पंधरा सदस्यांची एक विशेषाधिकार समिती नामनिर्देशित करतील.

२७९. (१) समिती, तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी करील आणि संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर, प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात, त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास भंगाचे स्वरूप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थितीदेखील ठरवील आणि विधानसभेकडे त्या विषयी अहवाल सादर करील.

(२) ह्या नियमाच्या पोट-नियम (१) च्या तरतुदींना अधीन राहून उक्त अहवालात, समितीने केलेल्या शिफारशी अंमलात आणताना विधानसभेने अनुसरावयाची कार्यपद्धतीही नमूद करता येईल.

२८०. (१) नियम १७८ च्या तरतुदींना अधीन राहून, समिती प्रमुखांनी किंवा सचिवांनी सही केलेल्या आदेशाद्वारे साक्षीदारास बोलावता येईल आणि तो समितीच्या उपयोगासाठी आवश्यक असतील असे कागदपत्र सादर करील.

(२) समितीपुढे सादर केलेला कोणताही पुरावा गुप्त किंवा गोपनीय समजणे हे तिच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

२८१. अहवाल सादर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर, समिती प्रमुख किंवा कोणताही सदस्य त्या अहवालावर विचार करण्यात यावा असा प्रस्ताव मांडतील.

२८२. कोणत्याही सदस्यास, नियम २८१ मध्ये उल्लेख केलेल्या अहवालावर विचार करण्यासाठी मांडलेल्या प्रस्तावाच्या सुधारणेची नोटीस, अध्यक्षांना योग्य वाटेल अशा नमुन्यात देता येईल: परंतु, उक्त प्रश्न एकतर मुदतीशिवाय किंवा कोणत्याही विवक्षित बाबीस अनुलक्षून समितीकडे पुन्हा सुपूर्द करण्यात यावा असा सुधारणेचा प्रस्ताव मांडता येईल.

२८३. अध्यक्षांस, समितीतील किंवा विधानसभेतील विशेषाधिकाराचा प्रश्न विचारात घेण्याशी संबंध असलेल्या सर्व बाबीसंबंधीच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी त्यांना आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील.

२८४. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अध्यक्षांना विशेषाधिकाराचा कोणताही प्रश्न विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी, चौकशीसाठी किंवा अहवाल सादर करण्यासाठी सोपविता येईल.

**(ब) सदस्यास अटक, स्थानबद्ध वगैरे केल्याबद्दल आणि मुक्त केल्याबद्दल सूचना देणे**

२८५. जेव्हा विधानसभेच्या एखाद्या सदस्यास फौजदारी गुन्हा केल्याचे आरोपावरून किंवा एखाद्या फौजदारी गुन्ह्यासाठी अटक करण्यास आली असले किंवा त्यास न्यायालयाने कैदेची शिक्षा दिली असेल किंवा एखाद्या कार्यकारी आदेशान्वये त्यास स्थानबद्ध केले असेल तेव्हा, ती कार्यवारी करणारा, यथास्थिती, न्यायाधीश, फौजदारी न्यायाधीश, किंवा कार्यकारी प्राधिकारी ताबडतोब अशा गोष्टीची अध्यक्षांस सूचना देईल आणि तीत यथास्थिती, अशी अटक, स्थानबद्धता किंवा दोषसिद्धी याबद्दलची कारणे तसे, स्थानबद्धतेचे किंवा कैदेचे ठिकाण दुसऱ्या अनुसूचित नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात दर्शविण्यात येईल.

२८६. जेव्हा विधानसभेच्या सदस्यांवर करण्यात आलेला खटला अनिर्णित असताना किंवा त्याच्या दोषसिद्धीविरूद्ध त्याने केलेले अपील अनिर्णित असताना किंवा अन्य प्रकारे त्याची जामीनावर सुटका करण्यात आली असेल तेव्हा संबंधित प्राधिकारी अशी गोष्टसुद्धा दुसऱ्या अनुसूचित नमूद केलेल्या योग्य त्या नमुन्यात अध्यक्षांना कळवील.

२८७. नियम २८५ किंवा नियम २८६ मध्ये उल्लेखिलेला पत्रव्यवहार अध्यक्षांना मिळाल्यावर अध्यक्ष, शक्य तितक्या लवकर, पुढील रीतीने त्याबाबतीत कार्यवाही करतील :-

(एक) अधिवेशन चालू असताना अशी अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबध्द किंवा कैद करण्यात आली असेल तर अध्यक्ष ही गोष्ट सभागृहास कळवतील, अधिवेशन चालू असतानाच, त्यानंतर

सदस्यांची सुटका करण्यात आल असेल तर उक्त गोष्टसुध्दा सभागृहास कळवण्यात येईल.

(दोन) ज्या कोणत्याही सदस्यास सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अटक करण्यात आली असेल किंवा स्थानबध्द किंवा कैद करण्यात आले असेल त्या सदस्यांचे अशा रितीने अटकेत किंवा स्थानबध्दतेत किंवा कैदेत असणे सभागृहाचे अधिवेशन सुरु झाल्यावरही चालू असेल तर, अध्यक्ष अशी गोष्ट सभागृहास कळवतील. अधिवेशन चालू असतानाच, त्यानंतर सदस्यांची सुटका करण्यात आली असेल तर, उक्त गोष्टसुध्दा सभागृहास कळवण्यात येईल.

(तीन) इतर सर्व बाबतीत अशा प्रकारचा पत्रव्यवहार विधानसभेच्या सदस्यांच्या माहितीसाठी "बुलेटिनमध्ये" प्रसिध्द करण्यात यावा असा अध्यक्ष निदेश देतील.

**(क) सभागृहाच्या आवारात वैध आदेशिका बजावण्याची आणि अटक करण्याची कार्यपध्दती**

२८८. अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही प्रकारे अटक करण्यात येणार नाही.

२८९. अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात फौजदारी स्वरुपाची किंवा दिवाणी स्वरुपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजावण्यात येणार नाही.

**(महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिका, पृष्ठ क्र. ११७-१२१)**